प्रस्तावना * -

कोल्हापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन ही केवळ वसुलीच्या कामापुरती मर्यादित नसून, सहकार कायद्यानुसार काम करत असताना जिल्ह्यातील सर्व नागरी सहकारी बँकांच्या संचालनात सुलभता यावी आणि सर्व बँकांची सर्वांगीण प्रगती व्हावी, या व्यापक उद्देशाने कार्य करत आली आहे. या उद्देशातील एक महत्त्वाचा भाग म्हणजे नागरी सहकारी बँकांमधील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करणे.

त्या दृष्टीने असोसिएशनने गेल्या काही वर्षात ठोस पावले उचलली आहेत. विविध नामांकित शैक्षणिक संस्थांशी सामंजस्य करार (MoU) करून प्रशिक्षण कार्यात आमूलाग्र सुधारणा करण्याचा प्रयत्न असोसिएशनने केला असून, त्यामुळे अलीकडच्या काळात अत्यंत चांगल्या पद्धतीने प्रशिक्षण कार्य सुरू आहे.

प्रशिक्षण देत असताना एक गोष्ट नेहमी ध्यानात येते की, या प्रशिक्षणाचा परिणाम हा अल्पकालीन राहतो. प्रशिक्षणादरम्यान कर्मचाऱ्यांनी जर काही नोट्स काढून त्याचा व्यवस्थित अभ्यास केला तरच त्याचा खरा उपयोग होतो. यासाठी बऱ्याचदा आम्ही प्रशिक्षकांचे नोट्स कर्मचाऱ्यांना देण्याचे काम केले.

मात्र बँकिंग हा असा विषय आहे की ज्यामध्ये रोज नवनवीन बदल होत असतात. त्यासाठी प्रत्येक कर्मचाऱ्याच्या हातात अभ्यासासाठी एक स्वतंत्र, परिपूर्ण आणि अद्ययावत पुस्तक असावे, असा आमचा बऱ्याच दिवसांपासूनचा विचार होता. बाजारातील छापील पुस्तके पाहिली तर त्यांच्या एकतर्फी वाढलेल्या किमती लक्षात घेता, ती खरेदी करून प्रत्येक कर्मचाऱ्यापर्यंत पोहोचवणे ही बाब अत्यंत कठीण होती. म्हणूनच यावर योग्य पर्याय शोधणे आवश्यक होते.

डिजिटलायझेशननंतर बाजारात बरीच डिजिटल बुक्स आली आहेत, परंतु त्यामध्ये बँकिंग विषयावरील, आणि विशेषतः नागरी सहकारी बँकांसाठी असलेली पुस्तके फारशी उपलब्ध नाहीत. हे कार्य यापूर्वी कोणी केले नव्हते. म्हणूनच महाराष्ट्रात पहिल्यांदाच हा विचार पुढे नेण्याचे धाडस आम्ही करण्याचे ठरवले.

दरम्यान, श्री. प्रशांत गंभीर यांनी त्यांच्या बँकेच्या कर्मचाऱ्यांसाठी काही अत्यंत सुंदर पुस्तके तयार केली होती. ती पुस्तके पाहिल्यानंतर मी त्यांना विचारले की, ही पुस्तके आपण जिल्ह्यातील सर्व बँकांच्या कर्मचाऱ्यांसाठी उपलब्ध करून देऊ शकतो का? त्यांनी ही कल्पना अत्यंत आनंदाने मान्य केली. त्यानंतर श्री. दीपक फडणीस आणि इतर अधिकाऱ्यांशी मी चर्चा केली, सर्वांनाच ई-लर्निंग बुक ही कल्पना खूप आवडली. मात्र विषय खूप मोठे होते आणि प्रत्यक्षात ती पुस्तके कशी तयार करायची, हे खूपच चॅलेंजिंग काम होते.

मग आम्ही काही सभा घेतल्या. त्यामध्ये श्री. शंकर मांगलेकर, श्री. दत्तात्रय राऊत यांसारख्या जेष्ठ बँकर्सनी अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले. त्यानंतर वेगवेगळे विषय वेगवेगळ्या लेखकांना देण्याच्या दृष्टीने श्री. सुधीर कदम, श्री. स्वप्निल बिद्रेवाडी, श्री. सुशील कुलकर्णी, श्री. पद्माकर जवळकर, डॉ. राजन पडवळ, श्री. चंद्रकांत झिरकांडे इत्यादी मान्यवरांना आम्ही विनंती केली. विशेष बाब म्हणजे प्रत्येकाने पुस्तक तयार करण्याची जबाबदारी लगेच स्वीकारली. यामध्ये विशेष कौतुक करावेसे वाटते ते डॉ. राजन पडवळ यांचे, ज्यांनी विद्यापीठांसोबत काम करत असतानाही नागरी सहकारी बँकांच्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करण्याची आंतरिक ओढ दाखवून विषयाचे पुस्तक देण्याचे आनंदाने मान्य केले.

अर्थात, पुस्तक तयार करण्याची इच्छा किंवा कल्पना असून चालत नाही, त्यासाठी असोसिएशनच्या संचालक मंडळाची मंजुरी असणे आवश्यक होते. याबाबतीत आम्हाला माननीय अध्यक्ष श्री. निपुण कोरे यांची नेहमीच अशा नाविन्यपूर्ण कार्यात मदत होत आली आहे. किंबहुना ही संकल्पना मूळ त्यांचीच होती. प्रशिक्षणाच्या पुढे जाऊन कर्मचाऱ्यांनी काहीतरी शिकावे, ही त्यांची आंतरिक तळमळ होती. म्हणून त्यांनी आमच्या कामाला ताबडतोब हिरवा कंदील दाखवून मंजुरी दिली, असोसिएशनमार्फत खर्च उचलण्याची तयारी दाखवली आणि त्यांच्या या विचाराला सर्व संचालक मंडळाने उचलून धरले.

या पद्धतीने पुस्तके तयार करण्याचे काम सुरू झाले. पण हे पुस्तक तयार करणे आणि डिजिटल स्वरूपात बँकांपर्यंत पोहोचवणे, यामध्ये डिजिटल निर्मितीचे काम हे सर्वात जोखमीचे आणि महत्त्वाचे होते. श्री. निखिल नंदेश्वर या तरुणाने आम्हाला याबाबत खूपच चांगले सहकार्य केले. केवळ मोबदल्यासाठी काम न करता, त्याने त्याच्या मित्रांच्या मदतीने हे काम पूर्णत्वास नेले. काम करत असताना बऱ्याच अडचणी आल्या, परंतु त्याने न डगमगता पुस्तक पूर्ण केले, त्याबद्दल त्याचेही विशेष कौतुक.

हे पुस्तक तयार करण्यामागचा प्रमुख उद्देश म्हणजे बँक कर्मचाऱ्यांना अद्ययावत ज्ञान मिळावेच, परंतु त्यामध्ये वेळोवेळी जे बदल होतील, त्या दुरुस्त्या त्यांना वेळच्या वेळी कळाव्यात. हे काम करताना असोसिएशनचे सध्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सुरेश शिंदे यांनी मोलाचे सहकार्य केले. वेळोवेळी पाठपुरावा करणे, पुस्तकाचे काम पूर्ण करून घेणे यासाठी त्यांनी भरपूर कष्ट घेतले. तसेच असोसिएशनच्या इतर कर्मचाऱ्यांनीही उत्साहाने हे काम पूर्ण केले आहे.

या पुस्तकामध्ये ठेवी, कर्जे, एनपीए, केवायसी, रिझर्व्ह बँकेचे सर्क्युलर्स, ह्यूमन रिसोर्स, मार्केटिंग, अकाउंटिंग इत्यादी सर्व महत्त्वाच्या बाबींचा अंतर्भाव करण्याचा कसोशीने प्रयत्न केला आहे. यापुढेही काही नवीन विषय आम्ही वाढवणार आहोत. हे पुस्तक तयार करताना बराच खर्च आला आहे, त्यासाठी नागरी सहकारी बँकांच्या जाहिराती घेणे, तसेच पुस्तकाचे रास्त मूल्य ठरवणे या बाबी कराव्या लागल्या आहेत. परंतु ते सर्वसामान्य कर्मचाऱ्याला परवडेल असे, कुठेही बोजड किंवा खर्चिक न ठेवता केले आहे.

आपल्या असोसिएशनने नेहमीच सर्व बँकांना उपयोगी पडेल असे काम केले आहे. या पुस्तकाद्वारे देशातल्या जास्तीत जास्त बँकांपर्यंत पोहोचण्याचे काम असोसिएशन करेल, हे निर्विवाद आहे. त्यासाठी काही पुस्तके इंग्रजीमध्ये भाषांतरित करण्याचे काम लवकरच सुरू केले जाणार आहे. पुस्तकाचे स्वरूप अत्यंत आकर्षक केले असून, कर्मचाऱ्यांना वाचताना नक्कीच आनंद मिळेल.

अशा पद्धतीने हे पुस्तक तयार करण्यासाठी ज्यांचे सहकार्य लाभले, त्या सर्वांचे मनःपूर्वक धन्यवाद आणि यापुढे या पुस्तकाचा दर्जा आणखी उंचावण्यासाठी सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

अनिल नागराळे